# महत्त्वाची सूचना

## सर्वंकष धोरणांतर्गत बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाशी संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निविडीकरीता घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Tests) व प्रवेश पत्र (Admit Card) बाबत

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या **स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५** संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वंकष धोरणांतर्गत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षांचे (Common Entrance Tests) पहिले सत्र **दि. ३० जुलै २०२४ ते १ ऑगस्ट २०२४** या कालावधीत आयोजित करण्यात आले असून त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. no. | Date | Exam Name | Institutes Involved |
|---|---|---|---|
| 1 | 30/07/2024 | 1. Common Entrance Test for Teacher Eligibility Test (TET) Competitive Examination Pre-Training Program Scheme at Maharashtra | TRTI |
| | | 2. Common Entrance Test for Maharashtra Public Service Commission (MPSC) Maharashtra Judicial Services Competitive Exam Pre-Training Scheme at Maharashtra | TRTI, BARTI, SARTHI |
| | | 3. Police and Army Recruitment Posts Competitive Examination Pre-Training Program Scheme at Maharashtra (Only BARTI candidates) | BARTI |
| 2 | 31/07/2024 | 1. Common Entrance Test for Staff Selection Commission (SSC) Central Services Competitive Examination Pre-Training Scheme at Maharashtra | TRTI, SARTHI, MAHAJYOTI |
| 3 | 1/08/2024 | 1. Common Entrance Test for Bank, IBPS, Railway, LIC, Nabard (grade A & B) SBI, (PO/SD/Clerical), RBI, Insurance, LIC, Regional Rural Banks (RRB), (PO/Clerical) & other Banking Recruitment Posts Competitive Examination at Maharashtra | TRTI, BARTI, SARTHI, MAHAJYOTI |

- वरील सर्व परीक्षांच्या वेळा उमेदवारांच्या प्रवेश पत्रावर (Admit Card) वर देण्यात आल्या आहेत त्यानुसार उमेदवारांनी परीक्षेस उपस्थित राहावे.
- या परीक्षांसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्यांना **दिनांक २५.०७.२०२४ रोजी सकाळी ११.०० पासून** प्रवेश पत्र Admit Card download करण्याची सुविधा बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्वतंत्र लिंक वरून उपलब्ध होईल व ती **दि. २५.०७.२०२४ ते ३०.०७.२०२४** पर्यंत उपलब्ध राहील.
- प्रवेश पत्र download करण्यासाठी उमेदवाराला त्याने अर्जात नमूद केलेल्या संपर्क क्रमांकावर प्रवेश पत्र - Admit Card live झाल्याबाबतचा म्हणजेच प्रवेश पत्र download करून घेण्यासाठी उपलब्ध झाले असल्याबाबतचा massage पाठविला जाईल.

- Admit Card download करण्यासाठी बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावरून URL लिंक दिली जाईल. उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक वर उमेदवाराने आपला Application No व PASSWORD (form भरताना जो वापरला आहे तो) किंवा Application No व Date of Birth (DD-MM-YYYY या format नुसार) योग्य ती माहिती नोंदवून आपले प्रवेश पत्र - Admit Card download करून घ्यायचे आहे.
- हे प्रवेश पत्र सदर परीक्षेसाठी अनिवार्य आहे. त्यात दिलेल्या सूचानांनुसारच उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहायचे आहे.
- प्रवेश पत्राबाबत काही तांत्रिक/अडचण उद्भवल्यास **संबंधित संस्थांच्या helpdesk क्रमांकांवर संपर्क साधावा.**
- सामायिक प्रवेश परीक्षांचे (Common Entrance Tests) दुसरे सत्र दि. १० ऑगस्ट २०२४ पासून पुढे नियोजित असून त्यामध्ये UPSC Civil Services, MPSC State Services (Gazetted Posts), MPSC Maharahstra Engineering Services (MES), MPSC Non Gazetted Group B & C, MPSC PSI, STI, ASO and MPSC Class III या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांबाबतच्या सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्याबाबतचे सविस्तर वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येईल.

**सर्व उमेदवारांना परीक्षेसाठी खूप खूप शुभेच्छा!**